Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC

# जलव्यवस्थापनाविषयीचे महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**प्रा. राम राजेंद्र हजारी,** राज्यशास्त्र विभाग, वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा, जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

भूपृष्ठावर उपलब्ध असलेल्या पाण्याचे संरक्षण, संवर्धन करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याच्या स्रोतांचे सर्व स्तरांना योग्य असे वितरण करणे याला जलव्यवस्थापन असे म्हणतात.

भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे जलसंपत्ती व ताण निर्माण होत आहे. पाण्याचा जर का योग्य पद्धतीने वापर केला नाही तर भविष्यात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. म्हणून पाण्याचा जास्तीत जास्त काटकसरीने व पर्याप्त वापर होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले जल व्यवस्थापनाविषयीचे विचार महत्त्वाचे ठरतात.

राष्ट्रपिता महात्मा गांधी एक द्रष्टे होते. त्यांनी निसर्गाशी सुसंगत राहण्याच्या तत्त्वावर भर दिला. जल व्यवस्थापना विषयी त्यांचे विचार अनेक दशकांपूर्वी व्यक्त झाले असले तरी आजही ते काळाशी सुसंगत आहेत. जलव्यवस्थापनावरील गांधीजींचे तत्त्वज्ञान 'साधी राहणी, शाश्वत विकास व सर्व सजीवांचे कल्याण' या मूल्यांवर आधारीत होते्.

आधुनिक भारताचा पाया भक्कमपणे उभारण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. त्यांचे योगदान देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक क्षेत्रात मार्गदर्शक ठरलेले आहे. डॉ. आंबेडकरांचे जल व्यवस्थापनाविषयीचे विचार खऱ्या अर्थाने दूरदर्शी होते. पूरनियंत्रण, सिंचन, वीज आणि जलवाहतूक प्रदान करतील अशा बहुउद्देशीय प्रकल्पांच्या गरजेवर त्यांनी भर दिला. जलसंसाधनांच्या अतिरिक्त आणि अयोग्य वापरामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आंबेडकरांचे जलव्यवस्थापनाबद्दलचे विचार उपयुक्त ठरतात.

**महात्मा गांधी**

महात्मा गांधीजींच्या मते जल म्हणजे मानवाला जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असलेला एक मौल्यवान स्रोत. 'पृथ्वीकडे सर्वांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत परंतु एका व्यक्तीची हाव पूर्ण करण्यासाठी पुरेसे संसाधन उपलब्ध नाही', असे सांगून त्यांनी जलसंधारणाच्या गरजेवर भर दिला. महात्मा गांधींनी नैसर्गिक संसाधनांच्या होणाऱ्या अतिवापराबद्दल चिंता व्यक्त केलेली दिसून येते. पाण्याचा योग्य पद्धतीने वापर करून जलसंधारणाला प्रोत्साहन देणाऱ्या सवयी आपण अंगीकृत केल्या पाहिजे असा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

त्यांचा आग्रह होता. त्यांच्या जलव्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पाणी साठवण्याचा पारंपारिक पद्धतीवर त्यांनी दिलेला भर. पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी व साठवण्यासाठी तलाव व तसेच इतर जलस्रोत निर्माण करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केलेले होते. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे पाण्याचे पारंपारिक पद्धतीने संवर्धन करणे सहज शक्य झाले. यामुळे भूजल पातळीत वाढ झाली आणि पुराचा धोका कमी झाला. महात्मा गांधीजींचा स्वदेशी ज्ञान आणि समुदाय आधारित उपक्रमांवर विश्वास होता. या विश्वासामुळेच त्यांनी पाणी साठवण्याच्या पारंपरिक पद्धतीचा अवलंब केला.

गांधीजींनी नैसर्गिक जस्त्रोतांचे प्रदूषणापासून संरक्षण करण्याची गरजही व्यक्त केली होती. त्यांचा असा विश्वास होता की नद्या, तलाव आणि इतर जलस्रोत पवित्र आहेत. भावी पिढ्यांसाठी त्यांचे जतन केले पाहिजे. पर्यावरण संवर्धनासाठी महात्मा गांधीजी वचनबद्ध होते. प्रदूषित जलस्रोतांची स्वच्छता करण्यासाठी त्यांनी स्वतः विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला व नेतृत्व केले. ते गंगा नदीच्या स्वच्छता कार्यक्रमात झाले. जलसंवर्धन यशस्वी करण्यासाठी त्यांनी सामुदायिक सहकार्यावर भर दिला.

'साधी राहणीमान व उच्च विचार' हे महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान होते. याच तत्वज्ञानाचा वापर त्यांनी जलव्यवस्थापनासाठी केला. व्यक्तींनी अशा जीवनशैलीचा अवलंब केला पाहिजे ज्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा वापर कमीत कमी होईल.

गांधीजींनी दुष्काळी भागात वनीकरणाला चालणा देण्यासाठी पुढाकार घेतला होता. गुजरातच्या काठीयावाड प्रदेशात दुष्काळ असताना स्थानिक समुदायाला झाडे लावण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे पाण्याचे जतन आणि मातीची धूप रोखण्यास मदत झाली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉक्टर आंबेडकरांनी प्रादेशिक विकासाला चालना देण्यासाठी पाण्याचे महत्व ओळखले होते.आंबेडकर जलस्त्रोतांच्या संवर्धनाचे पुरस्कर्ते होते. सिंचन, वीजनिर्मिती,जल वाहतूक व तसेच पाण्याची साठवणूक करण्यासाठी धरणे आणि जलाशयांच्या निर्मितीला त्यांनी प्रोत्साहन दिले. स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन प्रादेशिक पातळीवरच जलस्रोतांचे व्यवस्थापन व्हायला हवे असे त्यांचे मत होते.

१९४२ ते १९४६ या काळात डॉ. आंबेडकर व्हाईसरॉयच्या कार्यकारी कौन्सिलचे सदस्य होते. त्यांच्याकडे श्रम, सार्वजनिक बांधकाम,सिंचन व ऊर्जा खात्याची जबाबदारी होती. त्यांनी आपल्या कार्यकाळात सिंचन क्षेत्रात प्रभावीपणे कार्य केले. सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन आणि सेंट्रल टेक्निकल बोर्ड या नवीन व्यवस्था निर्माण केल्या. डॉ. आंबेडकरांनी देशातील अनेक बहुउद्देशीय प्रकल्पाचा पाया रचला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

बिहारमध्ये जमिनीची झीज रोखण्यासाठी आणि पश्चिम बंगाल मध्ये पुरापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी दामोदर प्रकल्पाची निर्मिती केली. दामोदर खोरे या योजनेमुळे जलसिंचन, पूरनियंत्रण, ऊर्जा निर्मिती व तसेच पिण्याच्या पाण्याची सोय झाली. ओरिसातील महानदीवरील हिराकुड प्रकल्प व सोन नदी खोरे प्रकल्प डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली. या प्रकल्पांमुळे पुरापासून होणारी हानी देखील कमी झाली. देशातील पाण्यासारखा मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केले. दीर्घकालीन योजनांची आखणी केली. जलसंपत्तीच्या विकासासाठी नदी खोरे आधार मानून सिंचन प्रकल्पाचे नियोजन करून बहुउद्देशीय प्रकल्पांची निर्मिती केली.

नद्यांच्या पाणी वाटपावरून होणारे वाद विवाद आणि राज्य राज्यातील संघर्ष लक्षात घेता आंबेडकरांनी पाणी हा विषय केंद्र सूचीमध्ये ठेवण्याची सूचना केली होती. जलसंसाधनांचे योग्य व्यवस्थापन व बहुउद्देशीय उपयोग करून घेतल्यास आर्थिक विकासास मदत होते असे त्यांनी विचार मांडले होते. आंबेडकरांनी जलधोरण, आंतरराज्य नद्या व तसेच सार्वजनिक हित लक्षात ठेवून घटनात्मक तरतुदी सुद्धा केलेल्या आहेत.

**समारोप**

महात्मा गांधीजींचे जलसंवर्धनाचे विचार दूरदर्शी होते. आजही ते आपल्याला जलव्यवस्थापनाच्या कार्यात मार्गदर्शक ठरतात. पाणी साठवण्याच्या पारंपरिक पद्धती, नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण आणि साधे राहणीमान यातून आपल्याला शाश्वत जलव्यवस्थापनाचे मौल्यवान धडे मिळतात. सध्या जग हवामान बदल, पाण्याची टंचाई आणि पर्यावरणाचा ऱ्हास या आव्हानांना तोंड देत असताना गांधीजींचे जल व्यवस्थापनाचे विचार महत्त्वपूर्ण ठरतात. सुसंगत राहून सर्व सजीवांच्या कल्याणाला चालना देणाऱ्या शास्वत पद्धतींचा अवलंब करणे असा महत्त्वपूर्ण विचार गांधीजींनी मांडला.

बाबासाहेब आंबेडकरांचे जलव्यवस्थापनाचे विचार खरोखरच अग्रगण्य होते. आणि ते आजही भारतातील जलव्यवस्थापन धोरणांना मार्गदर्शक ठरत आहेत.

**संदर्भसूची**

१. थोरात सुखदेव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विद्युत विकास भूमिका व योगदान सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००५

२. गुंजकर सोमनाथ व कापसे शिवसांब;संपाद्धए डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टिकोन अनुराधा प्रकाशन नांदेड प्रथम आवृत्ती २०१७


Copyright © | JET Network, All Rights Reserved

३. Guha, Ramachandra. "Mahatma Gandhi and the environmental movement in India." Environmental movements in Asia. Routledge, 2013. 65-82.

४. Bharathi, K. S. The social philosophy of Mahatma Gandhi. Vol. 4. Concept Publishing Company, 1991.


Copyright © | JET Network, All Rights Reserved